| Roll No. | | | | | | | | | | | Serial No. of Q. C. A. B. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 50 + 26 = 76 ] [ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 16

Total No. of Questions : 50 + 26 = 76 ] [ Total No. of Printed Pages : 16

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 08-M** ವಿಷಯ : **ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ**

**Code No. : 08-M Subject : First Language — MARATHI**

ದಿನಾಂಕ : 30. 03. 2009 ] [ Date : 30. 03. 2009

ಸಮಯ : ಬೆಳಿಗ್ಗೆ 10-30 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 1-30 ರವರೆಗೆ ] [ Time : 10-30 A.M. to 1-30 P.M.

ಪರಮಾವಧಿ ಅಂಕಗಳು : 125 ] [ Max. Marks : 125

**FOR OFFICE USE ONLY**

**PART – A**

| Q. No. | Marks | Q. No. | Marks | Q. No. | Marks | Q. No. | Marks | Q. No. | Marks | Q. No. | Marks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | | 10. | | 19. | | 28. | | 37. | | 46. | |
| 2. | | 11. | | 20. | | 29. | | 38. | | 47. | |
| 3. | | 12. | | 21. | | 30. | | 39. | | 48. | |
| 4. | | 13. | | 22. | | 31. | | 40. | | 49. | |
| 5. | | 14. | | 23. | | 32. | | 41. | | 50. | |
| 6. | | 15. | | 24. | | 33. | | 42. | | × | |
| 7. | | 16. | | 25. | | 34. | | 43. | | × | |
| 8. | | 17. | | 26. | | 35. | | 44. | | × | |
| 9. | | 18. | | 27. | | 36. | | 45. | | × | |
| *Total Marks of Part – A* | | | | | | | | | | | |

**PART – B**

| Q. No. | Marks | Q. No. | Marks | Q. No. | Marks | Q. No. | Marks | Q. No. | Marks | Q. No. | Marks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 51. | | 56. | | 61. | | 66. | | 71. | | 76. | |
| 52. | | 57. | | 62. | | 67. | | 72. | | × | |
| 53. | | 58. | | 63. | | 68. | | 73. | | × | |
| 54. | | 59. | | 64. | | 69. | | 74. | | × | |
| 55. | | 60. | | 65. | | 70. | | 75. | | × | |
| *Total Marks of Part – B* | | | | | | | | | | | |

| **Total Marks in words** | | **Grand Total** | |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| 1. ✓ | | | |
| 2. ✓ | | ✓ | ✓ |
| *Signature of Evaluators* | *Registration No.* | *Signature of the Deputy Chief* | *Signature of the Room Invigilator* |

[ Turn over

**सामान्य सूचना :**

i) प्रश्न व उत्तरपत्रिका एकत्रित असून, त्यात दोन विभाग आहेत, **Part - A** व **Part - B**.

ii) **Part - A** मध्ये 50 व **Part - B** मध्ये 26 प्रश्न आहेत.

iii) प्रश्नांची उत्तरे लिहिण्यासाठी पुस्तिकेमध्येच जागा दिलेली आहे.

iv) **Part - A** मध्ये दिलेल्या सूचना वाचून योग्य पर्याय क्रमांकासहित दिलेल्या जागामध्ये लिहा.

v) **Part - B** मध्ये प्रत्येक प्रश्नासाठी पुरेशी जागा दिलेली आहे. दिलेल्या जागामध्ये प्रश्नांची उत्तरे लिहावीत.

## PART - A

प्रत्येक प्रश्नाला किंवा अपूर्ण वाक्यांशाला चार पर्यायी उत्तरे दिली आहेत. त्यापैकी एकच बरोबर पर्यायी उत्तर निवडून खाली दिलेल्या रिकाम्या जागेत लिहा : 50 × 1 = 50

1. सत् + चरित्र याचा संधीयुक्त शब्द असा तयार होतो —

(A) सदाचरित्र (B) सद्चरित्र

(C) सच्चरित्र (D) सतचरित्र.

उत्तर : ______

2. <u>शिंप्या</u> कपडे शिवले. अधोरेखित शब्दाला कोणत्या विभक्तीचा प्रत्यय लागतो ?

(A) द्वितीया (B) तृतीया

(C) चतुर्थी (D) पंचमी.

उत्तर : ______

3. 'नाग फणा मारीत होता.' — प्रयोग ओळखा.

(A) कर्मणी (B) भावे

(C) कर्तरी (D) संकर.

उत्तर : ______

4. 'तो नेहमी आजारी असतो.' — काळ ओळखा.

(A) भविष्य काळ (B) भूत काळ

(C) रीति भूत काळ (D) रीति वर्तमान काळ.

उत्तर : ______

5. 'डोळ्यात केर आणि कानात फुंकर' या म्हणीचा अर्थ

(A) रोग एक उपाय वेगळाच (B) एका रोगावर अनेक उपाय

(C) उपायाशिवाय रोग बरा होत नाही (D) फुंकल्याने डोळ्यातला केर जातो.

उत्तर : ______

6. 'र' या गणाचा लघुगुरूक्रम कोणता ?

(A) — ∪ — (B) ∪ ∪ —

(C) — — ∪ (D) ∪ — ∪

उत्तर : ______

7. 'पाण्यात राहणारे प्राणी' या शब्दसमुहाला एक शब्द —

(A) निशाचर (B) जलचर

(C) उभयचर (D) रात्रीचर.

उत्तर : ______

8. खालीलपैकी कोणत्या शब्दसमुहात संख्याविशेषण आहे ?

(A) विद्वान माणूस (B) उंच झाड

(C) अर्धा तुकडा (D) दाट हिरवळ.

उत्तर : ______

9. 'रमणी' या शब्दाला समानार्थी शब्द

(A) परी (B) स्त्री

(C) देवता (D) सुंदर स्त्री.

उत्तर : ______

10. 'शकून' या शब्दाचा विरूद्धार्थी शब्द

(A) अशकून (B) शुभशकून

(C) निशकून (D) अपशकून.

उत्तर : ______

11. खालीलपैकी तद्भव शब्द जोळखा.

(A) कर्म (B) चर्म

(C) घर (D) जीर्ण.

उत्तर : ______

12. 'तू आता गप्प बैस' या वाक्याचा प्रकार

(A) विधानार्थी (B) आज्ञार्थी

(C) प्रश्नार्थी (D) मिश्र.

उत्तर : ______

13. इंद्रजित भालेराव यांचा ललित कथा संग्रह —

(A) गाई घरा आल्या (B) पीक पाणी

(C) दूर राहिला गाव (D) आम्ही काबाडाचे धनी.

उत्तर : ______

14. 'हिरा' या पाठात लेखकाने कोणते दर्शन घडविले आहे ?

(A) ग्रामीण जीवनाचे (B) प्रेमाचे

(C) बालमैत्रीचे (D) गरीबीचे.

उत्तर : ______

15. आजोबांचा सत्कार कोणत्या मंडळाने केला होता ?

(A) रूबाबदार (B) सदाबहार

(C) दिलबहार (D) इमानदार.

उत्तर : ______

16. म्हातारा कोण होता ?

(A) स्वातंत्र्य सैनिक (B) देशभक्त

(C) समाज सेवक (D) पुढारी.

उत्तर : ____________________

17. ओरिसा साहित्य अकादमी पुरस्कार याना मिळाला आहे.

(A) डॉ० किरण बेदी (B) डॉ० मीना प्रभू

(C) नीलम माणगावे (D) डॉ० प्रतिभा राय.

उत्तर : ____________________

18. झेंडयांचे रूपांतर कशात झाले ?

(A) चिंध्यात (B) फडक्यात

(C) काठीत (D) दोरीत.

उत्तर : ____________________

19. हळदीला स्वामित्व हक्कापासून वाचविणारे वैज्ञानिक

(A) जयंत नारळीकर (B) वसंत गोवारीकर

(C) होमी भाभा (D) रघुनाथराव माशेलकर.

उत्तर : ____________________

20. भीमराव गस्ती यांच्या आत्मकथनाचे नाव —

(A) बेरड (B) आक्रोश

(C) सांजवारा (D) शाळा.

उत्तर : ____________________

21. 'जिद्द' हा पाठ कोणत्या पुस्तकातून घेतला आहे ?

(A) आय डेअर (B) वॉट व्हेंट रॉंग ?

(C) अॅज आय सी (D) इट्स ऑलवेज पॉसीबल.

उत्तर : ____________________

22. मराठी ही कोणत्या भाषेच्या परंपरेतली भाषा आहे ?

(A) हिंदी (B) संस्कृत

(C) इंग्रजी (D) कन्नड.

उत्तर : ____________________

23. यापैकी एक प्रसिद्ध नाटककार कोण ?

(A) मारूती चितमपल्ली (B) भीमराव गस्ती

(C) कृ० प्र० खाडिलकर (D) ग० दि० माडगूळकर.

उत्तर : ____________________

24. 'आजी शरण येते' हा पाठ ................ या संग्रहातील आहे.
(A) देवचाफा (B) पोपटी चौकट
(C) टेकडीवरचे पीस (D) पुष्पांजली.

उत्तर : ______

25. यापैकी कोणते पुस्तक विद्याधर पुंडलिक यांचे नाही ?
(A) पोपटी चौकट (B) टेकडीवरचे पीस
(C) संशय कल्लोळ (D) पुष्पांजली.

उत्तर : ______

26. लोकहितवादीनी कोणत्या साप्ताहीकातून शतपत्रे प्रसिद्ध केली ?
(A) केसरी (B) मराठा
(C) इंदूप्रकाश (D) प्रभाकर.

उत्तर : ______

27. पानिपतच्या तिसऱ्या युद्धात मराठी फौज किती होती ?
(A) चाळीस हजार (B) चार हजार
(C) साठ हजार (D) सहा हजार.

उत्तर : ______

28. मातबर खासे पळो लागले या पाठाचे मूल्य
(A) व्यसनमुक्ती (B) भक्ती
(C) प्रेम (D) देशभक्ती.

उत्तर : ______

29. महानुभाव गद्य कोणी संपादित केले आहे ?
(A) कोलते (B) बाईदेव बास
(C) गोविंदप्रभू (D) चक्रधर स्वामी.

उत्तर : ______

30. सायंकाळचा पूजावसर या पाठाचा साहित्य प्रकार
(A) अर्वाचीन गद्य (B) बखर साहित्य
(C) प्राचीन गद्य (D) ग्रामीण साहित्य.

उत्तर : ______

31. भागवत ( वारकरी ) संप्रदायाचे संस्थापक
(A) रामदास (B) ज्ञानेश्वर
(C) तुकाराम (D) नामदेव.

उत्तर : ______

32. संत ज्ञानेश्वर यांचा एक ग्रंथ
(A) मनाचे श्लोक (B) पंचसुधा
(C) चांगदेव पासष्टी (D) भावार्थ मंजिरी.

उत्तर : ______

33. 'पत्रे समर्थांची' या पुस्तकाचे संपादन कुणी केले आहे ?

(A) समर्थ रामदास (B) सुनील चिंचोळकर

(C) संभाजी महाराज (D) लीना सोहनी.

उत्तर : ____________________

34. वामन पंडितांच्या गीता टीकेला काय म्हणतात ?

(A) यथार्थ दीपिका (B) भावार्थ दीपिका

(C) समश्लोकी टीका (D) गीता टीका.

उत्तर : ____________________

35. यशोदेने कृष्णाला कोणत्या वृक्षाला बांधले ?

(A) कृष्णार्जून (B) यमळार्जून

(C) भिमार्जून (D) नलकुबर.

उत्तर : ____________________

36. मोरोपंतानी आपल्या काव्यात या वृत्ताचा जास्त वापर केला आहे —

(A) दिंडी (B) पादाकुलक

(C) आर्या (D) नववधू.

उत्तर : ____________________

37. अक्षत निर्भय खेळे जेवि मकरपोत —

(A) पाण्यात (B) नदीत

(C) डबक्यात (D) सिंधूतोयात.

उत्तर : ____________________

38. मराठी भाषेतील प्रसिद्ध लावणीकार कोण ?

(A) बाळाजीराव (B) बाजीराव

(C) विश्वनाथ (D) होनाजी बाळा.

उत्तर : ____________________

39. पर्वणी या कवितेचा काव्यप्रकार

(A) भावगीत (B) भक्तीगीत

(C) लावणी (D) विरहिणी.

उत्तर : ____________________

40. बालकवीना असेही म्हटले जाते

(A) विडंबनकार (B) निसर्गकवी

(C) मोठे कवी (D) समग्र बालकवी.

उत्तर : ____________________

41. केशवकुमारांचे आत्मचरित्र कोणते ?

(A) कऱ्हेचे पाणी (B) झेंडूची फुले

(C) लग्नाची बेडी (D) श्यामची आई.

उत्तर : ____________________

42. 'आम्ही कोण' या कवितेचा काव्यप्रकार

(A) विडंबन (B) पोवाडा

(C) लावणी (D) फटका.

उत्तर : ______

43. मृदगंध केव्हा दरवळेल ?

(A) थंडी पडल्यावर (B) ऊन पडल्यावर

(C) पाऊस पडल्यावर (D) वादळ झाल्यावर.

उत्तर : ______

44. 'ग्रीष्मातल्या सकाळी' या काव्याचे मूल्य

(A) मानवता (B) निसर्ग प्रेम

(C) देशभक्ती (D) श्रद्धा.

उत्तर : ______

45. चित्रकूटाला रामाचे चरण लागल्यावर काय घडले ?

(A) शबरी आनंदी झाली (B) राक्षस पळून गेले

(C) सीतेचा शोध लागला (D) मुनी मुक्त झाले.

उत्तर : ______

46. 'माय' या कवितेचे कवी कोण ?

(A) ग० दि० माडगूळकर (B) निरंजन उजगरे

(C) वामन निंबाळकर (D) अविनाश ओगले.

उत्तर : ______

47. ढग कुठे उतरला होता ?

(A) इलेक्ट्रीकच्या तारेपर्यंत (B) बंगल्यापर्यंत

(C) पानापर्यंत (D) रस्त्यापर्यंत.

उत्तर : ______

48. दिनार, परिच्छेद, प्रहर, दिपवा हे काव्यसंग्रह कोणाचे ?

(A) पद्मा गोळे (B) अविनाश ओगले

(C) अरुणा ढेरे (D) निरंजन उजगरे.

उत्तर : ______

49. माणसावर कोणते शिक्के बसले आहेत ?

(A) आळशीपणाचे (B) जातीपातीचे

(C) स्वार्थीपणाचे (D) लाचारीचे.

उत्तर : ______

50. माणसाचे अभयारण्य या कवितेचे मूल्य

(A) मानवता (B) देशप्रेम

(C) निसर्ग प्रेम (D) परोपकार.

उत्तर : ______

## PART - B

खालील प्रश्नांची **दोन-तीन** वाक्यात उत्तरे लिहा.

51. राज्य साधनेसाठी काय-काय करावे असे समर्थ सांगतात ? 2

52. दारूमुळे कोणते दुष्परिणाम होतात असे लेखकाना वाटते ? 2

53. लघुगुरू लेखन करून वृत्त ओळखा.
मी राजाच्या सदनि अथवा घोर रानी शिरेन. 2

54. भारत हा विकसनशील देश म्हणून गणला जावा यासाठी डॉक्टरानी काय केले ? 2

55. ''जन्म देणारेच मारायला लागल्यावर जायचं कुठं ?'' संदर्भासह स्पष्ट करा. 2

56. डॉ किरण बेदी यांचा परिचय लिहा. 2

57. वामन पंडित यांचा परिचय लिहा. 2

58. अलंकार ओळखून लक्षणे लिहा. 2

दिव्याच्या प्रकाशात पुढून येणाऱ्या श्वापदाचे डोळे रत्नासारखे चमकत होते.

59. भावग्रही रस्त्याच्या मध्येच गाडी का थांबवत असे ? 2

60. शाळेत मिळणारे ज्ञान हे पुस्तकी आहे असे लेखकाना का वाटते ? 2

61. ''चला रं पोरानु, इथं काय काम न्हाय !'' ससंदर्भ स्पष्ट करा. 2

62. ''रात्रीचे वनदेव पाहुनि भुलतील रमाणी ! तुला'' संदर्भासहित स्पष्टीकरण करा. 2

63. खालील सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा. 2
अ) लोकनाथ ब) वनवेली.

64. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. 2
अ) पोटावर पाय देणे ब) कंकण बांधणे.

खालील प्रश्नांची **पाच-सहा** वाक्यात उत्तरे लिहा :

65. आशाराणी व त्यांच्या आईची फसवणूक कशी केली गेली ? याबद्दल तुम्हाला काय वाटते ? 3

66. मराठी भाषा प्रेमीनी कोणत्या बाबतीत सावध राहायला इवे ? 3

67. ‘आज चकोरा घरी पातली भुकेजली पौर्णिमा’ या वाक्यातील सत्यता पटवा. 3

68. आईला साप चावल्यावर काय-काय घडले ? 3

खालील प्रश्नांची **सात-आठ** वाक्यात उत्तरे लिहा.

69. वटवृक्षावर कोणकोणते पशुपक्षी जमा होतात याचे सविस्तर वर्णन करा. 4

70. वेगवेगळ्या ऋतुत चीनची भिंत कशी दिसते याचे वर्णन तुमच्या शब्दात करा. 4

71. 'भारतमातेची विनवणी' या कवितेचा सारांश थोडक्यात लिहा. 4

72. कोळीणीच्या पेहरावाचे वर्णन करून कोळ्याच्या दिनचर्येची माहिती द्या. 4

73. खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा. 4

मागे राहिलेले ............................................

..................................................................

..................................................................

..................................................................

..................................................... दयावंत.

74. खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. 5

मूर्तिपूजेत घाण शिरली आहे. डोळस मूर्तिपूजा सुरू झाली पाहिजे. मूर्तीपुढे धनद्रव्य टाकणे बंद झाले पाहिजे. जेथे सर्वांनी विनम्रभावाने यावे असे स्थान म्हणजे मंदिर. ते स्थान सरकारने स्वच्छ, पवित्र राखावे. तेथे मंगलभाव मनात येतील असे करावे. मंदिरात पवित्र होऊन बाहेरच्या जगात पवित्र व्यवहार करण्यास जाणे हा मूर्तीपूजेचा हेतू आहे. पण मोठ्या खेदाची गोष्ट ही की श्रेष्ठ-कनिष्ठ भावांची भूते मंदिरात धुडगूस घालीत आहेत. जेथे देवही पतित व भ्रष्ट होऊ लागला तेथे शुद्धी कोण करणार ?

i) मूर्तीपूजा कशी केली पाहिजे ?

ii) मंदिरासाठी सरकारने काय करावे ?

iii) मूर्तीपूजेचा हेतू कोणता ?

iv) मंदिर व मूर्तीपूजा याबाबत खेदाची गोष्ट कोणती ?

v) उताऱ्याला योग्य शीर्षक द्या.

75. तुम्ही परगावी आहात असे समजून आईला आपल्या प्रकृतीची काळजी घेण्याबाबत पत्र लिहा. 5

**किंवा**

परीक्षेच्या कालावधीत होणारे ध्वनीप्रदूषण थांबविण्याची विनंती करणारे पत्र पोलीस अधिकाऱ्याना लिहा.

76. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर **पँधरा** ते **वीस** ओळीत निबंधलेखन करा. 5

अ) अस्पृश्यता — एक सामाजिक समस्या

ब) एका स्वातंत्र्य सैनिकाचे मनोगत

स) माझ्या स्वप्नातील भारत देश.